# खड्डे

सकाळी पेपर उघडावा तर हल्ली सात्येनंद बातम्याच वाचायची वेळ येते. कुठे बलात्कार झालेले असतात, तर कुठे अपघात. उरलेले राजकारण्यांचे एकमेकांवर केलेले आरोप प्रत्यारोप. त्याला जोडीला रोज फोटो सहित खड्डे पुराण.

आता हे पुराण रोज वाचताना विचार आला, की खरच फक्त रस्त्यातच खड्डे असतात असे नाही. वेगवेगळ्या खड्ड्यांचा प्रवास आपण करतो, किंवा अनुभवत असतो.

जसे शेतकऱ्यांना पावसाच्या लहरीपणाला नेहमीच सामोरे जावे लागते. पाऊस वेळेवर पडला नाही म्हणजे पोटात गोळा येतो. नंतर मुला बाळांच्या विचाराने येणाऱ्या संकटाने पोटात खड्डा पडतो.

व्यापाऱ्यांना त्यांच्या धंद्यात झालेल्या चढउतारामुळे आणि मध्यम वर्गाला महागाई मुळे नेहमीच आर्थिक नुकसानीच्या खड्ड्याला सामोरे जावे लागते.

झोपड पट्टीत राहणाऱ्यांचे हालतर विचारूच नका. त्यांना पोटात भूके मुळे आर्थिक टंचाई मुळे पडणारे खड्डे अनुभवावे लागतात.

आता सगळ्यात महत्वाचे खड्डे म्हणजे आपल्या पुणे शहरातील रस्त्यातले! ते आपण नेहमीच सर्वजण अनुभवत आहोत. कधी कधी पावसाने ते तयार होतात. कधी रस्ते दुरुस्त झाले म्हणजे महावितरण वाल्यांना अंडर ग्राऊंड लाईनची दुरुस्ती करायची म्हणून पुन: खड्डे तयार. कधी पाण्याची पाईप लाईन टाकायची म्हणून खड्डे. ते परत दुरुस्त होत नाहीत. बुजवले जात नाहीत. आता काल म्हणजे परवा एक ट्रक खड्ड्यात पडल्याचा फोटो आणि बातमी होती. आहे ना कमाल!

खर तर हे खड्डे लगेच बुजवून दुरुस्त व्हायला पाहिजेत. इतक्या प्रचंड वाहतुकीला गती मिळायला हवी. सुरक्षा मिळायला हवी. ह्यासाठी आपण सर्वजण महापालिकेला लाखो रुपये कर देतो. आणि तरीही आम्हीच खड्ड्यात जातो. ह्या दुखण्यावर कोणीच इलाज करु शकत नाही. हे सगळे उघड्या डोळ्यांनी बघत बसावे लागते म्हणून खूप वाईट वाटते. आपण शेवटी हतबल होतो.

हे सगळे खड्डे जाणवतात दिसतात. पण एक काल्पनिक खड्डा पण आपण तयार केलेला आहे. आपले सगेसोयरे एकमेकांशी पटले नाही म्हणजे सहज म्हणतात जा खड्ड्यात! ह्या काल्पनिक खड्ड्यात पडण्याने आपण आता इथेच थांबू.

सौ. सुनंदा शामकान्त दीक्षित.
सृष्टी अपार्टमेंट कोथरूड पुणे.

